अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

-: प्रेस नोट :- **दि.०६/११/२०२६**

बेकायदेशिर अंमली पदार्थ जवळ बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करून अटक केल्याबाबत.

दिनांक ०६/११/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, पोलीस पथक गस्त करीत असताना डी ३/ओमकार को.ऑ.हौ.सोसायटी, गांधीनगर, काजुपाडा पाईप लाईन, कुर्ला, पश्चिम, मुंबई ४०००७२ या ठिकाणी कोडेन फास्पेट मिश्रित अंमली पदार्थाच्या बाटल्या विक्री साठी रूम मध्ये साठा केल्याने ०१ महीलेस ताब्यात घेवुन अटक केलेली आहे. अटक केलेल्या आरोपी महीलेचा तपशिल खालील प्रमाणे.

१ हसीना खबुलसाब होरपेट, वय ३८, वर्षे रा.ठी. कुर्ला पश्चिम, मुंबई .

उपरोक्त नमुद आरोपीकडुन प्रत्येकी १०० मिली च्या कोडेन फास्पेट मिश्रित अंमली पदार्थाच्या ४६० बाटल्या. (किं.अं. ४,६०,०००/- रू.) जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची उत्कृष्ठ कारवाई ही श्री. देवेन भारती, मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. अनिल कुंभारे, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, मा. पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. सुधिर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत बांद्रा युनिटचे प्रभारी पो.नि. विशाल चंदनशिवे यांचे नेतृत्वात बांद्रा युनिट पोलीस पथकाने केली आहे.

-oo-